# बृहन्मुंबई महानगरपालिका

श्री हरिलाल भगवती महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय, बोरीवली (प), मुंबई – 400 103.

एचओ/924/बीएच (एनटीसी) दि.10.06.2026

## जाहिरात

सामान्य परिचर्या व प्रसूतीशास्त्र अभ्यासक्रम (3वर्ष) फक्त महीला उमेदवारांकरीता

दिनाक 01.08.2026 पासून खालील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परिचर्या प्रशिक्षण संस्थांमध्ये सुरु होणा-या सामान्य परिचर्या व प्रसूतिशास्त्र अभ्यासक्रमाकरिता प्रशिक्षण घेउ इच्छिणा-या महिला उमेदवांराकडून मुबंई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर संगणकीय (ऑनलाईन) पध्दतीने विहीत प्रपत्रांमध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत.http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन सेवा या संदर्भामध्ये GNM NURSING ADMISSION या शीर्षका खाली प्रवेश प्रकीये विषयी माहीती व वेळापत्रक दिनांक 12.06.2026 पासुन उपलब्ध करुन देण्यात येईल यांची नोंद घ्यावी. ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत दि.18.06.2026 ते दि. 29.06.2026.

1. रा.ए स्मारक रुग्णालय, परळ मुंबई-400012.
2. बा.य.ल नायर धर्मा रुग्णालय, मुंबई सेंट्रल, मुंबई 400008.
3. लो.टी.म.स. रुग्णालय,सायन,मुंबई 400022.
4. डॉ.आर.एन कूपर रुग्णालय,विलेपार्ले,मुंबई 400056.
5. श्री.हरीलाल भगवती रुग्णालय बोरीवली,मुंबई 400103.

निवड झालेल्या उमेंदवारांना सामान्य परीचर्या व प्रसूतिशास्त्र अभ्यासक्रमासोबत सार्वजनिक आरोग्य परिचर्या आणि प्रसूतिशास्त्र आंतरवासीहासहीत 3 वर्ष अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घ्यावे लागेल. (अभ्यासक्रमाचा कालावधी व अभ्यासक्रमाचे विषय भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांच्या ठरावासापेक्ष).

स्त्री उमेदवारानी रुग्णालयाशी सलंग्न असलेल्या निवास स्थांनामध्ये (वसतीगृहामध्ये) रहाणे अनिवार्य आहे.

विद्यावेतन - दरमहा रु. 100-110-120 अधिक 680/- गणवेश भत्ता अधिक रु.300/- धुलाई भत्ता अधिक मोफत वसतीगृह निवासस्थान व मोफत भोजन या सुविधा आहेत.

अर्हता –

1. उमेदवार महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाची उच्च माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शांलात प्रमाणपत्र परिक्षा(10+2) अथवा समतुल्य परीक्षा शासन मान्य संस्थेतून प्राधान्याने जीवशास्त्र, रसायनशास्त, भौतिकशास्त्र (BIOLOGY, CHEMISTRY,

PHYSICS) या शास्त्र विषयांसह (पी.सी.बी.) कमीत कमी 40 टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे आवश्यक पात्रता धारण करणारे उमेदवार पुरेशा संख्येने उपलब्ध झाले नाहीत, तर महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाची कला शाखा व नंतर वाणिज्य शाखा या क्रमाने शाखेतील आणि कोणत्याही विषयातील उच्च माध्यमिक परिक्षा (10+2) कमीत कमी 40टक्के गुंणानी उत्तीर्ण करणा-या खुला गटातील उमेदवांराचा व कमीत कमी 35 टक्के गुणांनी उत्तीर्ण होणा-या मागासवर्गीय गटातील उमेदवारांचा प्रवेशासाठी विचार करण्यात येईल.

2. या अभ्यासक्रमासाठी उपलब्ध असलेल्या जागांतुन सहाय्यकारी परिचारीका प्रसाविका अभ्यासक्रम (Auxiliary Nurse Midwifery) सुधारीत अभ्यासक्रम उत्तीर्ण असलेल्या महाराष्ट्र परिचर्या परिषद,महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ (MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION RECOGINIZED) महीला उमेदवारांसाठी 5 टक्के जागा राखीव असतील. मात्र असे उमेदवार आवश्यक अर्हता (10+2) धारण करीत असावेत व या अभ्यासक्रमाबाबतच्या अन्य अटिंची पूर्तता करीत असावेत, तथापी विहीत केलेल्या प्रपत्रकात प्रतिज्ञापत्र सादर करण्यासापेक्ष जे उमेदवार कोठेही नोकरीला नसतील त्यांना विद्यावेंतन अनुज्ञेय राहील. या जागाकरीता जर असे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर सदर जागेत उर्वरीत जागां मिळविण्यात येतील

3. अपंगासाठी 5% जागा आरक्षित राहतील या जागांवर उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांमधुन निवड करण्यात येईल.

4. उमेदवार दहावी (10 वी ) व बारावी (12 वी) इयत्ता परीक्षा महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाची माध्यमिक आणि उच्च माध्यमिक अथवा समतुल्य शिक्षण मंडळातुन उत्तीर्ण झालेली असली पाहीजे.

5. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम उच्च परीक्षा किमान 50 गुंणाचा मराठी विषय घेउन (निम्नस्तर किंवा उच्चस्तर) उत्तीर्ण असावा. मराठी भाषा सुलभतेने लिहीता, वाचता व बोलता आली पाहीजे.

6. पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे.

**वयोमर्यादा :-**

दिनाक 31/07/2026 रोजी 17 ते 35 वर्ष

उमेदवाराचा जन्मदिनाक 01/08/1991 पासून 31.07.2009 पर्यंत असल्यास प्रवेशास पात्र समजले जाईल.

**समुपदेशन :-**

समुपदेशनासाठी निवड झालेल्या उमदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने मुळ प्रमाणपत्रे ऑनलाईन अर्जाची प्रत, अर्ज शुल्क पावती सहीत हजर राहावे लागेल. समुपदेशनाकरीता पात्र उमदवाराची यादी महानगरपलिकेच्या संकेतस्थळावर जाहीर केली जाईल व समुपदेशनासाठी हजर राहणेकरीता उमेदवारांना कुठलाही वैयक्तीक पत्रव्यवहार केला जाणार नाही समुपदेशन श्री हरीलाल भगवती रुग्णालय (NTC) मुंबई 4000103 परिचर्या शाळा येथे घेण्यात येईल.

**सेवच्या अटी :-**

निवड झालेल्या उमेदवारांना महानगरपालिका कर्मचा-याची वर्तवणूक व शिस्तविषयक नियम व विद्यार्थी परिचारीकांसाठी घालुन दिलेले नियम अधिनियम यांचे बंधन राहील.

उमेदवारांना एकदा प्रवेश घेतल्यांनतर मध्येच अभ्यासक्रम सोडुन जाता येणार नाही अन्यथा अभ्यासक्रम मध्येच सोडल्यास रु. 13004/- इतका दंड आकारण्यात येईल.

अ) विद्यार्थी परीचारीका प्रवेशासाठी एकुण सख्या 350

आ) शासन नियमाप्रमाणे सामजिक आरक्षण खालीलप्रमाणे आहे.

| प्रवर्ग | अ जा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | इडब्लूयुए स | एसईबी सी | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आरक्षण | 13% | 7% | 3% | 2.5% | 3.5% | 2% | 2% | 19% | 10% | 10% | 28% |
| आरक्षित जागा | 45 | 24 | 11 | 9 | 12 | 7 | 7 | 67 | 35 | 35 | 98 |

शासन निर्देशानुसार 1) जात प्रमाणपत्र व जात वैधताप्रमाणपत्र 2) अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमाती प्रवर्ग वगळता मागासवर्गातील उमेदवारांनी विमुक्त जाती (अ) भटक्या जमाती (ब) भटक्या जमाती (क) भटक्या जमाती) (ड) विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग,आर्थिकदृष्या दुर्बल (E.W.S) तो उन्नत व प्रगत वर्गात सामाविष्ट होत नाही असा उल्लेख असलेले सक्षम प्राधिका-यांनी दिलेले अगदी अलीकडील प्रमाणपत्र (NON CREAMY LAYER) सादर करणे आवश्यक आहे.

वि.जा (अ),भ.ज.(ब) भ.ज (क) व.भ.ज (ड) या प्रवर्गासाठी विहित केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनिय राहील.जर मागासवर्गीयांच्या कोणत्याही प्रवर्गातील राखीव जागा रिक्त राहील्यास त्या

उर्वरित मागासवर्ग प्रवर्गातिल उमेद्वारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. तसेच ONLINE अर्जाची किंमत खुल्या प्रवर्गासाठी रु. 678/- + जीएसटी 18% (एकुण रु.800/-) सर्वकरांसहीत (CGST-9% & SGST 9%) आणि मागासवर्गीयांसाठी रु. 452/- + जीएसटी 18% (एकुण रु. 533/-) सर्वकरांसहीत (CGST -9% & SGST 9%) आकारण्यात येईल. ऑनलाईन पध्दतीने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे आणि वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करत अर्ज परिपूर्णरित्या सादर करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. प्रवेश प्रक्रियेसंदर्भात महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर मार्गदर्शक पुस्तिका उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**विशेष नोंद**

भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र राज्य सुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडाळाच्या (MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION) ठरवानुसार सदर पदविका अभ्यासक्रम प्रशिक्षण कालावधी तसेच अभ्यासक्रमातील विषय बदलण्याची शक्यता आहे याची नोंद घ्यावी. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याची आढल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

सही/-
प्राचार्या
श्री. हरिलाल भगवती म.न.पा.
सर्वसाधारण रुग्णालय,
बोरीवली (प.), मुंबई - 400103

सही/-
वैद्यकीय अधिकारी
श्री. हरिलाल भगवती म.न.पा.
सर्वसाधारण रुग्णालय,
बोरीवली (प.), मुंबई - 400103

सही/-
प्रमुख वैद्यकीय अधिकारी
श्री. हरिलाल भगवती म.न.पा.
सर्वसाधारण रुग्णालय,
बोरीवली (प.), मुंबई - 400103